जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ११५ दिनांक - १७/०२/२०२५**

वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर

## प्रतिबंधीत मांडुळांची विक्री करणा-या दोन युवकांना वानवडी पोलीसांनी केले जेरबंद त्यांचेकडुन सुमारे १० लाख रुपये किंमतीचे रेडसन मांडुळ केले जप्त

दिनांक १४/०२/२०२५ रोजी वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर हद्दीत कोंबीग ऑपरेशन व अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पो.उप निरी धनाजी टोणे,सहायक पोलीस उप निरीक्षक रमेश साबळे,पोलीस अमंलदार सर्फराज देशमुख,गोपाळ मदने,अमोल गायकवाड,विष्णु सुतार,संदिप साळवे असे वानवडी पोलीस स्टेशनचे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस अंमलदार **संदिप साळवे व सर्फराज देशमुख** यांना त्यांचे बातमीदार मार्फत बातमी मिळाली की दोन इसम हे मांडूळ जातीचे वन्यप्राणी घेवुन विक्री करण्यासाठी साईबाबा मंदिर चौक,जगताप चौक, वानवडी पुणे येथे येणार आहेत.

अशी बातमी मिळ्याल्याने पोलीस उप निरीक्षक धनाजी टोणे यांनी दोन पंच साक्षीदार व स्टाफ समवेत साईबाबा मंदिर चौक,जगताप चौक,वानवडी पुणे येथे जावून सापळा रचला असता दिनांक १५/०२/२०२५ रोजी रात्रौ ००/५० वाजण्याचे सुमारास दोन इसम येताना दिसले व त्यापैकी एकाचे हातात लाल व काळे रंगाची बॅग दिसली. बातमीप्रमाणे खात्री होताच छापा घालून ताब्यात घेतले असता त्यांनी त्याची नावे **१) महंमद कामराण अब्दुल करीम वय ३० वर्षे रा.गुलबर्गा, हागरगा क्रॉस,झमझम कॉलणी,नसीरिया मश्जिद जवळ,कर्नाटक राज्य, २) मिथुन शेट्टीबा मंजुळे वय ३० वर्षे रा.मु.पो.विद्यानगर ता.निलंगा जि.लातुर** असे असल्याचे सांगीतले. सदर इसमांचे कब्जात १० लाख रु.कि.चे एक रेडसन जातीचे मांडुळ हा वन्यजीव प्राणी मिळुन आला. व तो वन्यजीव प्राणी संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत शेडयुल ३ मधील प्रतिबंधीत मांडुळ जातीचे सरपटनारे प्राणी असल्याची खात्री झाल्याने पोउनि धनाजी टोणे यांनी आमचे व पंचांचे उपस्थितीत सविस्तर पंचनाम्याने ताब्यात घेवुन वरील आरोपी विरुध्द वन्यजीव प्राणी संरक्षण कायदा १९७२ चे कलम २(१६),९,४४(१)(सी) प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आलेला आहे.रेडसन जातीचे मांडुळ हे मा.संचालक,वन्य प्राणी संग्राहालय,बावधान,पुणे याचे ताब्यात संरक्षणार्थ देणेत आलेले आहे.

सदरची कारवाई ही मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक वानवडी पो.स्टे.श्री.सत्यजित आदमने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.गोविंद जाधव यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पो.उप निरी धनाजी टोणे,पोलीस अंमलदार रमेश साबळे,सर्फराज देशमुख,संदिप साळवे,सोमनाथ कांबळे, गोपाळ मदने,अमोल गायकवाड,विष्णु सुतार,यांनी केली आहे.